‘लठ्ठपणा, मधुमेहाने हृदयविकाराचा धोका’

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : जागतिक स्तरावर, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीच्या आजारांमुळे दरवर्षी २ कोटी ५ लाखांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू होतो, यापैकी ८५ टक्के मृत्यू हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघातामुळे होतात. लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाब कालांतराने धमन्यांना हळूहळू नुकसान पोहोचवतो आणि अखेरीस अचानक ब्लॉकेज निर्माण होऊन हृदयविकाराचा धोका उद्भवू शकतो. त्यामुळे हृदयासंबंधीच्या किरकोळ तक्रारींकडे दुर्लक्ष न करता वेळेवर तपासणी, लवकर उपचार केल्यास अकाली मृत्यू टाळता येतो, असा सल्ला डॉक्टरांनी जागतिक हृदय दिनानिमित्त दिला.

बहुतेक हृदयविकाराचे झटके अचानक येत नाहीत. अनेकदा काही दिवस किंवा आठवडे आधीच छातीत दाब जाणवणे, धाप लागणे किंवा अकारण थकवा येणे यांसारखी लक्षणे जाणवतात. या संकेतांकडे दुर्लक्ष न करता वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे फोर्टिस एस्कॉर्ट्स हार्ट इन्स्टिट्यूटमधील कार्डियाक सायन्सेसचे अध्यक्ष डॉ. अशोक सेठ म्हणाले.

लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचे वाढते प्रमाण, सोबतच धूम्रपान, अयोग्य आहार यामुळे हृदयरोगाचा धोका तरुण वयोगटात वाढत आहे. त्यामुळे नियमित शारीरिक हालचाल, वजन नियंत्रणात ठेवणे, तंबाखू सोडणे, संतुलित आहार आणि नियमित तपासणी ही हृदयविकाराच्या झटक्यापासून बचाव करण्यासाठी ढाल आहे, असे तज्ज्ञ सांगतात. तर हृदयासाठी सर्वात मोठे सुरक्षाकवच लक्षणांबद्दल जागरूकता हे आहे, असे इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी सरचिटणीस डॉ. नरेंद्र सैनी सांगितले.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
कार कर्ज
@7.70%*
शून्य प्रक्रिया शुल्क
मिस्ड कॉल द्या 8010 614 614
अर्जासाठी स्कॅन करा
*नियम व अटी लागू

आजारापुढे गुढघे टेकू नका !
अंगदुखी, गॅसेस, अपचन इ.साठी
आजच डॉ पुष्कराज यांच्याकडून
नाडी परीक्षण करून घ्या.
डॉ. मानसी
डॉ. पुष्कराज
Tanvi HERBALS
क्लिनिक
आजच आरोग्य सल्ल्यासाठी डॉक्टरांची अपॉइंटमेंट घ्या
9920149535 | 9833683021

अहिल्यानगरमध्ये तणाव

शहरात आक्षेपार्ह मजकुरावरून रास्ता रोको, दगडफेक, लाठीमार; २८ जण ताब्यात

लोकसत्ता प्रतिनिधी

शहरातील कोठला भागात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

अहिल्यानगर : शहरात सोमवारी सकाळी दोन गटांत तणाव निर्माण होऊन रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. रास्ता रोको दरम्यान दगडफेक झाल्याने पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी लाठीमार करत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. दुपारनंतर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी एकास अटक केली तर रास्ता रोको दगडफेक, वाहनांची तोडफोड प्रकरणी पोलिसांनी २८ जणांना ताब्यात घेतले आहे.

नवरात्रीनिमित्त शहरात सोमवारी दुर्गा दौडचे आयोजन करण्यात आले होते. ही दौड ज्या मार्गावरून जाणार होती, त्या मार्गावर माळीवाडा भागात स्वागताची रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीमध्ये काही आक्षेपार्ह मजकूर असल्याचा आक्षेप विरुद्ध जमावाने घेतला. त्यातून वादाला सुरुवात झाली. आक्षेपार्ह रांगोळी काढणाऱ्यांवर कारवाई करावी यासाठी जमाव कोतवाली पोलीस ठाण्यासमोर जमा झाला. विरुद्ध बाजूचा जमावही तेथे आला. अटकेच्या मागणीसाठी निदर्शने सुरू झाल्याने कोतवाली पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी लाठीमार केला. या लाठीमाराच्या निषेधार्थ जमावाने कोठला भागात नगर-मनमाड रस्त्यासमोर रास्ता रोको आंदोलन सुरू केले.

हे आंदोलन सुरू असतानाच राज चेंबर इमारतीच्या बाजूने दगडफेक सुरू करण्यात आली. यावेळी वाहनांची तोडफोड सुरू झाल्याने पोलिसांनी पुन्हा लाठीमार करत जमावाला पांगवले व धरपकड सुरू केली. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपअधीक्षक दिलीप टिपरसे व शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी, कोतवालीचे निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखान्याचे निरीक्षक आनंद कोकरे आदींनी फौजफाट्यासह आंदोलन ठिकाणी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

दरम्यान शहराचे उपविभागीय अधिकारी दिलीप टिपरसे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख अल्तमस सलीम जरीवाला (रा. पिरशाह खुंट, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संग्राम आसाराम रासकर व त्याच्या पत्नीविरुद्ध धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा दाखल करून संग्राम रासकर याला अटक करण्यात आली आहे. रासकर याला न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार कोठला भागातील चौकात बेकायदेशीर जमाव जमवून पोलिसांवर दगडफेक करणे, तोडफोड करणे या कारणांसाठी पोलिसांकडून फिर्याद देण्यात आली. त्यामध्ये २८ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यातील तिघांना अटक करण्यात आली आहे.

आमदार जगताप यांचा ठिय्या

दरम्यान नवरात्रातील दुर्गा दौडच्या मार्गावर काही ठिकाणी जाणीवपूर्वक आक्षेपार्ह फलक लावण्यात आले. ते काढावेत या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन तास ठिय्या दिला. कोतवालीचे निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी कार्यवाहीचे आश्वासन दिल्यानंतर आमदार जगताप तेथून गेले. मात्र दुर्गा दौडच्या मार्गावर काही जणांनी जाणीवपूर्वक भावना दुखावतील असे कृत्य केले, मारहाण केली असा आरोप आमदार जगताप यांनी केला.

दुसरी ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या यू-डायसमध्ये नोंदीस मुभा

मुंबई : संचमान्यता ठरविण्यासाठी केंद्र सरकारने विद्यार्थ्यांची संख्या ३० सप्टेंबरपर्यंत यू-डायसवर नोंदविण्याच्या सूचना शाळांना दिल्या होत्या. मात्र इयत्ता दुसरी ते बारावीपर्यंतच्या शाळांमध्ये थेट प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची यू-डायसवर नोंदणीसाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नव्हती. त्यामुळे शाळाबाह्य विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात शाळांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने इयत्ता दुसरी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी लिंक उपलब्ध केली असून १७ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करण्याची सूचना शाळांना केली आहे. शाळांमध्ये नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांची यू-डायसवर नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू होती. मात्र कधीच शाळेत न गेल्याने वयोमानानुसार थेट दुसरी ते बारावीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी यू-डायसवर सुविधा उपलब्ध नसल्याने हा निर्णय घेण्यात आला.

ड्रॉपबॉक्समध्ये ९ लाख २७ हजार विद्यार्थी

शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये यू-डायस प्रणालीतील ड्रॉपबॉक्समध्ये राज्यातील तब्बल ९ लाख २७ हजार ४१४ विद्यार्थ्यांची नोंद झाली आहे. एका शाळेतून दुसऱ्या शाळेत गेलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीची देवाणघेवाण ड्रॉपबॉक्समार्फत केली जाते. २०२४-२५ मध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती तातडीने ड्रॉपबॉक्समधून घेण्याचे काम शाळांनी तातडीने पूर्ण करावे, अशी सूचना आहे.

अहिल्यानगरमध्ये अनेक गावे पाण्यात

अहिल्यानगर : सततच्या अतिवृष्टीने बेजार झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्याला पावसाने रविवारपासून विश्रांती घेतल्याने दिलासा मिळाला आहे. त्यामुळे नद्या, ओढे, नाले यांची पूर परिस्थिती ओसरली असली, तरी धरणांच्या जलाशयाचा फुगवटा व साठा नियंत्रित करण्यासाठी धरणातून पाणी सोडल्याने तसेच शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा न झाल्याने अनेक गावे अद्याप पाण्यातच आहेत. परिणामी पंचनाम्यांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. आपत्ती निवारणाची बचाव पथकेही विसावली आहेत.

अहिल्यानगर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड, पारनेर, श्रीगोंदा, नेवासे आदी भागांत पंधरा दिवसांतच सरासरीपेक्षा दीडपट ते दुप्पट पाऊस झाला. पुराच्या पाण्याने शेतीही खरवडून गेली. सततच्या अतिवृष्टीने पिके सडू लागली आहेत. शेतात केवळ पीकच नाही तर मातीही शिल्लक राहिलेली नाही. अनेक ठिकाणी तर शेतात केवळ आता दगडगोटेच दिसत आहेत. कपाशी पिकावर मर रोग वाढू लागला आहे. भुईमूग पाण्याखाली गेला आहे. पूर्ण खरीप हंगामच पाण्यात गेला आहे. दुभती जनावरेही अनेक ठिकाणी वाहून गेल्याने जोडधंद्यालाही मोठा फटका बसला आहे.

मराठवाड्यातील पूर ओसरेना

जायकवाडीतून विक्रमी विसर्गानंतर १७ हजार जण सुरक्षित स्थळी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर: मराठवाड्यातील पाऊस पूर्णतः थांबला असला, तरी नगर व नाशिक जिल्ह्यातील पावसामुळे जायकवाडी जलाशयात तीन लाख सात हजार प्रतिसेकंद घनफूट वेगाने विसर्ग करावा लागल्याने गोदावरी नदीपट्ट्यात पूरस्थितीचे गांभीर्य रविवारी वाढले होते. पैठण, माजलगाव आणि गेवराईतील स्थिती गंभीर होती. आतापर्यंत १७ हजार ८८५ जणांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. या दरम्यान गेल्या २४ तासांत सात जणांचा मृत्यू झाला. यात चौघे जण पुरात वाहून गेले.

जायकवाडी धरणातून रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास तीन लाखांहून अधिक प्रतिसेकंद घनफूट वेगाने पाणी सोडले. गोदाकाठी सुरक्षिततेसाठी प्रशासनाला कसरत करावी लागली. दरम्यान, पैठणच्या नाथ मंदिरात पाणी वाढत गेले. गागाभट्ट चौक, जुनी बाजारपेठेत या भागात पाणी शिरले.

जालना जिल्ह्यातून सर्वाधिक आठ हजार जणांना सुरक्षित स्थळी हलवले. सोमवारी सकाळी पैठणच्या नाथसागरातून विसर्ग कमी करण्यात आला.सिंदफणा नदीच्या परिसरातील गावांमध्ये पूर परिस्थिती कायम आहे.

भीमा, माण नदीकाठच्या गावांना पुराचा धोका

लोकसत्ता वार्ताहर

पंढरपूर : सीना नदीचा पूर थांबतोय ना थांबतोय, तोच आता भीमा नदी आणि दुष्काळी माण नदीला पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. भीमा अर्थात चंद्रभागा नदीत उजनी धरणातून सोमवारी दुपारी ४ वाजल्यापासून १ लाख २५ हजार क्युसेक, तर वीर धरणातून ७ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू केल्याने भीमा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. तसेच सांगोला येथील माण नदी दुथडी भरून वाहत असून, म्हसवड येथील राजेवाडी प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू असून येथेही सतर्कतेचा इशारा दिला आहे. दरम्यान, सीना नदीकाठच्या २९ गावांत अद्याप पाणी आहे. मात्र, धोका टळला असला, तरी प्रशासन सतर्क आहे.

सोलापूर जिल्ह्यात पावसापाठोपाठ आता नदीला पुराचे संकट घोंगावत आहे. सीना नदीत लगतच्या जिल्ह्यातून येणाऱ्या पाण्याचा विसर्ग कमी झाला आहे. तसेच पावसाने काहीशी विश्रांती घेतली आहे. मात्र, अहिल्यानगर आणि धाराशिव या जिल्ह्यांना अलर्ट दिला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील करमाळा, माढा, मोहोळ,बार्शी, अक्कलकोट, उत्तर व दक्षिण सोलापूर या तालुक्यांत प्रशासन अलर्ट आहे. जिल्ह्यात अद्याप २९ गावांत पाणी आहे, तर ज्या गावात पाणी ओसरले आहे त्या ठिकाणी स्वच्छता, टँकरद्वारे पाणी, आरोग्य सेवा, जनावराना चारा, धान्यवाटप सुरू आहे. तसेच पूरग्रस्त गावांत मदतीचा ओघ सुरू आहे. आम्हाला शासनाकडून धान्य मिळाले आहे. तसेच चारा मिळाला आहे. आता लाइट सुरू करावी, अशी मागणी माढातील बबन शिंदे या शेतकऱ्याने केली आहे.

दुसरीकडे कायम दुष्काळी भागातील माण नदी दुथडी भरून वाहत आहे. सांगोला येथील माण नदीत म्हसवड येथील राजेवाडी प्रकल्पातून पाणी येत आहे. त्यामुळे नदीकाठी सतर्कतेचा इशारा दिला आहे.

उजनी धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे पंढरपुरातील चंद्रभागा नदीपात्रालगतची मंदिरे पाण्याखाली गेली असून घाटाला पाणी लागले आहे. (छाया : दत्तात्रय देशमुख, पंढरपूर)

२४३२ कोटींच्या निधीची गरज

पुरामुळे मराठवाड्यातील २७०१ किलोमीटरचे रस्ते, १५०४ पूल, २२२ तलाव, १०६४ शाळा, ९५६७ विजेचे खांब, ५८ शासकीय इमारतींचे नुकसान झाले असून, ३९२ पाणी पुरवठ्याच्या योजना नादुरुस्त झाल्या. या सर्व योजना पूर्वपदावर आणण्यासाठी २४३२ कोटी रुपयांचा निधी लागेल, अशी माहिती प्रशासनाने सरकारला दिली.

पहिले आधारकार्डप्राप्त रंजना सोनवणे आजही कुडाच्या घरात

केवळ दोनच शासकीय योजनांचा लाभ

निलेश पवार, लोकसत्ता

नंदुरबार : देशातील पहिले आधारकार्ड नंदुरबार जिल्ह्यातील रंजना सोनवणे यांना मिळाले होते. परंतु, आधार कार्डमुळे शासकीय योजनांचा मोठ्या प्रमाणावर लाभ होऊन आपल्या जीवनात बदल होईल, ही त्यांची अपेक्षा फोल ठरली आहे. आजही त्यांना मोलमजुरीच करावी लागत आहे. २९ सप्टेंबर २०१० रोजी दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहन सिंग आणि काँग्रेसच्या तत्कालीन अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या उपस्थितीत शहादा तालुक्यातील टेंभली गावच्या रहिवासी रंजना सोनवणे यांना देशातील पहिल्या आधार कार्डधारक होण्याचा मान मिळाला. परंतु त्या अद्यापही वृद्धापकाळ आणि श्रावणबाळ या योजनांच्या लाभापासून निराधारच असून आजही कुडाच्या घरात जीवन व्यतित करत आहेत.

घरकुलातही अडचणी

आठ- दहा वर्षांत शासनाकडून उज्वला योजनेतंर्गत गॅस जोडणी आणि बांधकाम कामगारांसाठीच्या योजनेतून भांड्याच्या लाभाव्यतिरीक्त कुठल्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यांच्या मुलांना शासनाकडून घरकुल मंजुर झाले असले तरी साधन साहित्याचा अभाव आणि येणाऱ्या हप्त्यांच्या अडचणींमुळे मुलाचे घरही अपूर्ण असल्याचे रंजना सोनवणे सांगतात.

हेतुक दर्शितकरने के लियेसुचना
(साधारण प्रारूप)
सेवामे,
श्री न्यायालय अपर जिला न्यायाधीश महोदय
क्रम संख्या 3, उदयपुर (राज.)
जमनी बाई बनाम देवीलाल व अन्य
प्रकरण संख्या – 113/2024 मु.दी.
प्रेषिती : मेसर्स श्री जी डवलपर्स जरिए भागीदार मुकेश सुरेश गुन्देचा S/o श्री सुरेश गुन्देचा एवं साधना महेश गुन्देचा पता 1916, राम लेन रत्ला गिरि बाजार पेठ, रत्ला गिरि (महाराष्ट्र) 415612
उक्त प्रार्थी ने इस न्यायालय में वाद बाबत विभाजन एवं स्थायी निषेधाज्ञा के तहत् प्रस्तुत किया है।
अतःआपको चेतावनी दी जाती है कि उक्त निगरानी आवेदन के विरूद्ध दर्शित करने के लिये तारीख.9.10.25 को सुबह 10 बजे स्वयं या अपने प्लीडर द्वारा जिसे सम्यक रूप में अनुदेश दिया गया हो उपसंजात हो।यदि आप ऐसा करने में असफल रहेगें तो उक्त आवेदन की सुनवाई और उसका निपटारा एक पक्षीय रूप से किया जायेगा।यह आज तारीख 26.9.2025 को मेरे हस्ताक्षर और न्यायालय की मुद्रा लगाकर दी गई है।
मुहर
उपर जिला न्यायाधीश
क्रम संख्या–3,उदयपुर

वाद पदों के स्थिरीकरण के लिये सम्मन
(आदेश 5 के नियम 1 और 5)
सेवामे, श्री न्यायालय अपर जिला न्यायाधीश महोदय
क्रम संख्या 3, उदयपुर (राज.)
जमनी बाई बनाम देवीलाल व अन्य
प्रकरण संख्या 132/2024 ई.दी.
1.प्रेषिति–मेसर्स श्री जी डवलपर्स जरिए भागीदार मुकेश सुरेश गुन्देचा पिता श्री सुरेश गुन्देचा एवं साधना महेश गुन्देचा पता 1916, राम लेन रत्ला गिरि बाजार पेठ, रत्ला गिरि (महाराष्ट्र) 415612
वादी ने आपके विरूद्ध वाद बाबत विभाजन स्थाई निषेधाज्ञा एंव आदेशात्मक निषेधाज्ञा के लिये वाद संस्थित किया है। आपको इस न्यायालय में ता.9.10.25 को दिन मे 10AM बजे दावे का उत्तर देने के लिये उपसंजात (हाजिर) होने के लिये सम्मन किया जाता है। आप न्यायालय में स्वयं या किसी ऐसे प्लीडर द्वारा उपसंजात हो सकते है। जिसे सम्यक अनुदेश दिये गये हो और इस वाद से सम्बन्धित सभी सारवान प्रश्नों के उत्तर दे सकें या जिसके साथ ऐसा कोई व्यक्ति हो जो ऐसे सब प्रश्नों के उत्तर दे सके। आपको यह भी आदेश दिया जाता है कि आप उस दिन अपनी प्रतिरक्षा का लिखित कथन दाखिल करे और उस दिन ऐसे दस्तावेज जो आपके कब्जे या शक्ति में है, पेश करे। जिन पर आपका प्रतिरक्षा या मुजराई का दावा या प्रतिदावा आधारित है और यदि आप किसी अन्य दस्तावेज पर चाहे व आपके कब्जे या शक्ति में हो या न हो, अपनी प्रतिरक्षा या मुजराई के दावे या प्रतिदावे के समर्थन में साक्ष्य के रूप में निर्भर करते है तो या ऐसे दस्तावेजों को लिखित कथन के साथ उपबद्ध की जाने वाली सुविष्ट करे। आपको सुचित किया जाता है कि यदि आप ऊपर बतायी गई तारीख को इस न्यायालय में उपसंजात नहीं होगें तो वाद की सुनवायी और उसका निपटारा आपकी अनुपस्थिति में किया जायेगा।
यह आज तारीख 26.9.2025 को मेरे हस्ताक्षर और न्यायालय की मुद्रा लगाकर दिया गया कृपया ध्यान दे।
मुहर
उपर जिला न्यायाधीश
क्रम संख्या–3,उदयपुर

उद्योगांच्या गरजेनुसार पॉलिटेक्निकच्या शिक्षकांना प्रशिक्षण

मुंबई : तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाबरोबरच औद्योगिक आंतरवासिता उपलब्ध करून देण्यात येत आहे. यातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचाही अनुभव मिळत आहे. त्यांना प्रशिक्षण देणारे शिक्षक अद्ययावत असणे गरजेचे आहे, ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने पॉलिटेक्निक संस्थांमधील शिक्षकांचा उद्योजगतातील प्रत्यक्ष अनुभव अद्ययावत असावा यासाठी त्यांना औद्योगिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांना २७ ऑक्टोबर ते १२ डिसेंबर या कालावधीत विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

चार गटांमध्ये विभागणी

बीएसएनएल झेडटीटीसी, पुणे येथे होणाऱ्या प्रशिक्षणांमध्ये एकूण चार गटांचा समावेश केला आहे. २७ ते ३१ ऑक्टोबर रोजी डेटा कम्युनिकेशन या विषयाचे प्रशिक्षण होणार असून, १० ते १४ नोव्हेंबरदरम्यान मोबाइल कम्युनिकेशन, २४ ते २८ नोव्हेंबरदरम्यान स्विचिंग व बेसिक टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर, ८ ते १२ डिसेंबरदरम्यान ट्रान्समिशन व एफटीटीएच टेक्नॉलॉजी या विषयावर प्रशिक्षण असून प्रत्येक गटासाठी ३० जागा आहेत.

भरतपुर विकास प्राधिकरण, भरतपुर
क्रमांक :- लेखा/II/2024-25/13350 दिनांक :- 19/09/2025
संशोधित ऑनलाईन निविदा सूचना सं. 15/2025-26
इस कार्यालय के पत्र क्रमांक लेखा/भ.वि.प्रा./2025–26/13022–35 दिनांक 13.09.2025 के द्वारा अल्पकालीन ऑनलाईन निविदा सूचना संख्या 15/2025–26 कुल 08 कार्यों हेतु जारी की गयी थी। उक्त निविदा, में अपरिहार्य कारणों से आंशिक संशोधन किया जाता है।
निविदा में क्रम संख्या 02–07 ऑनलाइन निविदा अपलोड/प्राप्त करने की तिथि 25.09.2025 सांय 06:00 बजे तक एवं निविदा खोलने की दिनांक 26.09.2025 सांय 04:00 बजे निर्धारित थी। उक्त ऑनलाइन निविदा क्रम संख्या 02–07 कार्यों की अपलोड/प्राप्त करने की तिथि 25.09.2025 सांय 06:00 बजे तक के स्थान पर उक्त निविदा दिनांक 01.10.2025 को सांय 06:00 बजे तक अपलोड की जा सकेगी एवं बी.जी. जमा कराने की दिनांक 03.10.2025 प्रातः 10:00 बजे से 03:00 बजे तक कमरा नम्बर 17 में ऑफलाईन जमा कराई जावेगी तथा निविदा दिनांक 03.10.2025 को सांयः 04:00 बजे तकनीकी बिड खोली जावेगी।
निविदा में क्रम संख्या 08 ऑनलाइन निविदा अपलोड/प्राप्त करने की तिथि 29.09.2025 सांय 06:00 बजे तक एवं निविदा खोलने की दिनांक 01.10.2025 सांय 04:00 बजे निर्धारित थी। उक्त ऑनलाइन निविदा कार्य संख्या 08 की अपलोड/प्राप्त करने की तिथि 29.09.2025 सांय 06:00 बजे तक के स्थान पर उक्त निविदा दिनांक 06.10.2025 को सांय 06:00 बजे तक अपलोड की जा सकेगी एवं बी.जी. जमा कराने की दिनांक 07.10.2025 प्रातः 10:00 बजे से 03:00 बजे तक कमरा नम्बर 17 में ऑफलाईन जमा कराई जावेगी तथा निविदा दिनांक 07.10.2025 को सांयः 04:00 बजे तकनीकी बिड खोली जावेगी तथा
उक्त निविदा के क्रम संख्या 8 में वर्णित कार्य में निम्नानुसार आंशिक संशोधन किया जाता है।
बिड डॉक्यूमेन्ट के Special Condition Of The Contract For Post Qualification Of Contractors में Criteria 2(a) में अंकित टेबल के बिन्दु संख्या B में "Steel Reinforcement" के स्थान पर "Steel Reinforcement / Structural Steel" पढ़ा जावे।
निविदा की शेष शर्ते यथावत रहेंगी।
अधिशाषी अभियन्ता-तृतीय
भरतपुर विकास प्राधिकरण, भरतपुर
राज.संवाद/सी/25/11056

आपल्या आदरणीय प्रणेतेच्या प्रेमळ स्मृतीप्रित्यर्थ
डॉ. केकी एच. घरडा
पद्मश्री
संस्थापक, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

२५ सप्टेंबर १९२९ – ३० सप्टेंबर २०२४
दूरदर्शी शास्त्रज्ञ, उद्योजक, परोपकारी
तुमचा नवनिर्मितीचा वारसा, अखंडता, कामासाठी समर्पण आणि राष्ट्रउभारणी सुरू आहे.
GHARDA PARIVAR

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat
परिशिष्ट-IV-ए - स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतूदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव-विक्रि सूचना
नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ कस्तुर्बा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय नाशिक : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लँडमार्क, तनिष्क शोरुम जवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२००२.
याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. "ए" मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या / ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. "डी" मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक / प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिल्यानुसार) "मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" / सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्रि याखाली दिलेल्या तपशीलानुसार "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्वावर करण्यात येणार आहे. ऋणको / गहाणकार / विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. "ए" मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको / गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया "मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" / सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं. / ऋणको / सह-ऋणको / हमीदार / विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहाणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/NSK/0817/416631 & NHL/1018/585309, धोंडिराम चिंतामण लोहाकरे / मनिषा धोंडिराम लोहाकरे - शाखा कार्यालय : नाशिक	रु. २५,०८,५९३.७४ व २३.०६.२०२१	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट नं. बी १३, तळमजला, "श्रीमंत होम्स", बिल्डिंग "बी", सर्व्हे नं. ७९ २ए व ७९ ४ए, मातोश्री प्रेरणा लॉन्ससमोर, साई पॅलेस हॉटेलच्या मागे, विजय नगर, मौजे भागूर, महाराष्ट्र-४२२५०२.	रु. १७०६०००/-	रु. १७०,६००/-	१५.१०.२०२५	रु. १०,०००/-	०३.१०.२०२५ रोजी दु. १२:०० ते दु.०४:००	१६.१०.२०२५ रोजी दु.०२.०० ते दु. ०३:००	* काही नाहीत / ज्ञात नाही

* त्याकरिता वसुली आणि / किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित. ** "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. "के" मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर / सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार / दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरीददार / बोलीदाराद्वारा, त्याच्या / तिच्याकडील, सोसावयाचे आहेत / प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार / बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत. (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मत्तेची विक्रि करणे, अभिहस्तांतरण आणि / किंवा वासलात लावणे यापासून "पीएनबीएचएफएल"ला / "पीएनबीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि / किंवा निषेधाज्ञा आलेली नाही. (२.) भावी खरीददार / बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेल्या व मंजूर केलेल्या प्रक्रिया / आदेश, इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता "पीएनबीएचएफएल"कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादेत नाहीत आणि निविदा / बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार / खरीददाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता / सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. (४.) "सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड" ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले - प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट - www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहाणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास श्री. गणेश अंकूश / निलाक्षी पाटील, टोल-फ्रि नं. : १८०० १२० ८८००, ईमेल : auction@pnbhousing.com, जी "पीएनबीएचएफएल"ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.
स्थळ : नाशिक, दिनांक : ३०.०९.२०२५
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

खेड नगरपरिषद खेड, जि. रत्नागिरी
(तीनबत्ती नाका. मु. पो. ता. खेड, जि. रत्नागिरी)
फोन नंबर- ०२३५६/२६३०२४ फॅक्स नं. ०२३५६/२६३०८० ई-मेल-khednp1940@gmail.com
जा.क्र./१५१८/सन-२०२५-२६ दिनांक २९/९/२०२५
खेड नगरपरिषद, खेड
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी बायोमायनिंग करणे या कामाची ई निविदा सुचना शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक-२९/९/२०२५ रोजीने ऑनलाईन प्रसिध्द करणेत येत आहे. या बाबतची सविस्तर सुचना व त्या संबंधित निविदेच्या अटी व शर्ती वरील नमुद केलेल्या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.
शिक्का
स्वाक्षरी/-
मुख्याधिकारी
खेड नगरपरिषद

अलिबाग नगर परिषद
ई-निविदा सूचना
मुख्याधिकारी, अलिबाग नगर परिषद, अलिबाग- रायगड, खाली नमूद केलेल्या कामांसाठी मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून ई-निविदा पद्धतीने वार्षिक निविदा मागवीत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम	इसारा रक्कम	सुरक्षा अनामत रु.	निविदेच्या कामाचा कालावधी	निविदा फॉर्म फी
१.	अलिबाग नगर परिषद हद्दीतील शहर सफाई, रस्ते सफाई व घंटागाडीद्वारे दारोदारी जाऊन ओला व सुका कचरा गोळा करणे तसेच सार्वजनिक कचरा कुंड्यातील कचरा संकलन विलगीकरण व वाहतूक करणे व घाणीच्या ठिकाणी पावडर टाकणे, रस्त्याच्या दुतर्फा, समुद्र चौपाटी परिसर, जलकुंभ परिसर, मुख्याधिकारी निवासस्थान परिसर, स्मशानभूमी परिसरातील गवत काढणे, मराठी शाळा, तसेच रस्त्यावरील डेब्रीज, माती उचलुन वाहतूक करणे, मृत जनावरांची विल्हेवाट लावणे बाबत निविदा.	३,३१,९२,८२६/-	३,३१,९२८/-	९% बिलातून	कार्यादेश मिळालेपासून पुढील एक वर्षापर्यंत तसेच पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत	१०,०००/-

ई-निविदा प्रक्रियेचा दिनांक व वेळेचा तपशील

वेळापत्रक	दिनांक पासून	वेळ	दिनांक पर्यंत	वेळ
निविदा प्रसिद्धी	३०.०९.२०२५	--	--	--
निविदा फॉर्म व परिशिष्ट मिळविण्याचा कालावधी (डाऊनलोड)	३०.०९.२०२५	११.००	०७.१०.२०२५	१७.००
निविदा ऑनलाइन भरण्याचा कालावधी	३०.०९.२०२५	११.००	०७.१०.२०२५	१७.००
निविदा पूर्व बैठक	०३.१०.२०२५	११.००		
ऑनलाइन निविदा उघडण्याचा कालावधी	०८.१०.२०२५ (प्रशासकीय सोयीनुसार शक्य झाल्यास)	१७.३०		

१. वरील कामाबाबत संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. वरील कामाची निविदा प्रक्रिया ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाइन करण्यात येत असून, या निविदेसंबंधी सविस्तर निविदा सूचना व यापुढील सर्व सूचना/ शुद्धिपत्रके www.mahatenders.gov.in या वेबसाइटच्या माध्यमातून ऑनलाइन करण्यात येतील.
सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगर परिषद